**SNA-SPARSH कार्यपध्दतीव्दारे केंद्र पुरस्कृत व संबंधित राज्य संलग्न प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत निधी वेळेवर (Just-in-Time) वितरीत करण्यासाठी "महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार" (Maharashtra State Cyber Treasury) करिता आहरण व संवितरण अधिकारी घोषित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : ग्रासयो-२०२५/प्र.क्र. ३१९/बांधकाम-१**
बांधकाम भवन, ५ वा मजला, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मंत्रालय, मुंबई - ४०० ००१
दिनांक : २० ऑगस्ट , २०२५

वाचा :

१) वित्त मंत्रालय, भारत सरकार यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र.file No.१(२७)/PFMS/२०२०, दि.१३.०७.२०२३.
२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५१/कोषा प्रशा-४, दि.१०.१०.२०२४.
३) ग्राम विकास विभाग, शासन आदेश क्र.ग्रासयो-२०२४/प्र.क्र.३७३/बांध१,दि.०८.११.२०२४.
४) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५४/कोषा-प्रशा-४, दि.२३.०४.२०२५
५) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५१/कोषा प्रशा-४, दि.३०.०७.२०२५

**<u>प्रस्तावना :</u>**

ग्राम विकास विभागाकडील केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी वितरीत करण्याकरिता "SNA-SPARSH" प्रणाली लागू करण्यात आलेली आहे. "SNA-SPARSH" प्रणालीतंर्गत वित्त विभागाने (Single Nodal Account Portal (SNAP) प्रणाली विकसित केलेली आहे. ग्राम विकास विभागाकडील केंद्र पुरस्कृत व संबंधित राज्य संलग्न योजनांकरीता संदर्भ क्र.३ च्या आदेशान्वये SNA (Single Nodal Agency) म्हणून महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था (MRRDA) यांना घोषीत करण्यात आलेले आहे.

२. उपरोक्त संदर्भीय ०४ अन्वये "महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालय, मुंबई" या कार्यालयाची स्थापना करण्यात आली आहे व त्याचा 'कोषागार संकेतांक ८१०१ असा आहे. या कोषागार कार्यालयातुन देयके आहरित करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कार्य करण्यास संबंधित केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत संबंधित राज्य संलग्न योजनेसाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून विवक्षितरित्या घोषित करण्यात येतील असेच अधिकारी सक्षम राहतील. त्यासाठी संबंधित प्रशासकीय विभाग विहित कार्यपध्दती अनुसरुन, सदर अधिकाऱ्यांना महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालयावरील आहरण व संवितरण अधिकारी म्हणुन अधिकृतरित्या घोषित करतील. या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना प्रचलित कार्यपध्दतीप्रमाणे संचालनालय, लेखा व कोषागारे यांचेमार्फत समुचित "आहरण व संवितरण अधिकारी संकेतांक" देण्यात येतील. "SNA-SPARSH" कार्यपध्दतीच्या प्रयोजनार्थ राज्य सायबर कोषागार कार्यालयावरील आहरण व संवितरण अधिकारी म्हणून शासनाव्दारे घोषित करणेबाबत सुचित करण्यात आलेले आहे. या अनुषंगाने ग्राम विकास विभागाकडील केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत राज्य संलग्न योजना (MH-२९-PMGSY) आणि (MH-६८६ PM JANMAN) करीता सायबर कोषागारातून देयके आहरीत करण्यासाठी ग्राम विकास विभागांतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेतील कार्यासन बांधकाम-१ येथील "कक्ष अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी" घोषीत करणेची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

ग्राम विकास विभागाकडील SNA SPARSH प्रणालीद्वारे केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत राज्य संलग्नित प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेची (SLS) MH-२९-PMGSY आणि MH-६८६ PM JANMAN महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, मुंबई यांचेमार्फत अंमलबजावणी करणेत येत आहे, अशा वर नमूद केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री ग्राम सडक योजनांचा (SLS) निधी सायबर कोषागार कार्यालयातून (कोषागार सांकेतांक ८१०१) देयकाद्वारे आहरीत करण्यासाठी एकल समन्वय यंत्रणा महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेंतर्गत कार्यासन बांधकाम-१ येथील "कक्ष अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषीत करणेत येत आहे.

२. "SNA-SPARSH" कार्यपध्दतीच्या प्रयोजनार्थ घोषीत करण्यात उपरोक्त आलेले अधिकारी हे त्यांचेकडील आहरण व संवितरण विषयक कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या, त्यांना दुय्यम असणाऱ्या अन्य अधिकाऱ्यांकडे प्रत्यायोजित करु शकणार नाहीत. तसेच, शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय या व्यवस्थेमध्ये कोणताही बदल केला जाणार नाही.

३. उक्त शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२९२/२०२५/को.प्र.५, दि.१३.०८.२०२५ अन्वये विभागांनी दिलेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०८२०१३२४०२६६२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRASHANT VINAYAKRAO PATIL

Digitally signed by PRASHANT VINAYAKRAO PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=2B1BAD66664B1E11E3BF66DB1D526143E814DB5F8C505422AF66A5628314537E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9524CAB2D5A858B4A01FF72F5CAE5FDDC4F8C964F3AFC6B6249294AD88EC870D, cn=PRASHANT VINAYAKRAO PATIL
Date: 2025.08.20 16:15:02 +05'30'

(प्रशांत पाटील)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
४. मा. विरोधी पक्षनेता महाराष्ट्र विधानपरिषद/ विधानसभा, विधानभवन मुंबई.
५. मा.विधान सभा/ मा.विधान परिषद सदस्य (सर्व)
६. मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव
७. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
९. अप्पर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक
१०. अप्पर मुख्य सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक
११. प्रधान सचिव (ग्राम विकास) यांचे स्वीय सहायक
१२. उप सचिव (सर्व), ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई
१३. वित्त विभाग (व्यय-१५/अर्थसंकल्प-१७/कोषा-प्रशा-४) मंत्रालय, मुंबई-३२
१४. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१५. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१६. कार्यासन (बांध-१), ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई निवडनस्ती (आस्था-१५)